**एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम**

**सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थेस एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांकरिता ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर) याकरीता अनुदान वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : बीयुडी-०४२६/प्र.क्र.१८/प्रशि-३**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
**दिनांक**:- १४ ऑक्टोबर, २०२६

**वाचा**:- १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. टिआरएन-२०१३/प्र.क्र.८४/१३/१२-अ, दि.२०.०१.२०१४

२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. टिआरएन-२०१३/प्र.क्र.८४/१३/१२-अ, दि.२०.०१.२०१४

३. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६

४. लेखाधिकारी, वनामती, नागपूर यांचे पत्र क्र. वनामती/सीपीटीपी/पाया. प्रशि/प्रशि. शुल्क/२०२६-२७/२३२९, दि.११.०६.२०२६

५. प्रशासकीय अधिकारी (सीपीटीपी), वनामती, नागपूर यांचे पत्र क्र. वनामती/सीपीटीपी-१०/सत्र-३/अनुदान मागणी/२०२६-२७/३०३७, दि.११.०८.२०२६

**प्रस्तावना:-**

वाचा अनुक्रमांक १ येथील शासन निर्णयानुसार शासन सेवेमध्ये सरळसेवेने नियुक्त होणाऱ्या गट-अ व गट-ब मधील विविध संवर्गातील अधिकाऱ्यांसाठी एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. प्रशिक्षणासाठी प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी उपलब्ध करुन द्यावयाचा निधी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक ०८/०८/२०१४ अन्वये निश्चित करण्यात आला आहे.

त्यानुसार सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात मागणी क्र. ए-४, २०७०-इतर प्रशासनिक सेवा, (००)(११), वनामती, नागपूर या संस्थेस एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सहायक अनुदान (अनिवार्य) (२०७० ०८६२), ३१-सहायक अनुदान (वेतनेतर) या उद्दिष्टाखाली वनामती, नागपूर या संस्थेस निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात मागणी क्र. ए-४, २०७०-इतर प्रशासनिक सेवा, (००)(११), वनामती, नागपूर या संस्थेस एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सहायक अनुदान

(अनिवार्य) (२०७० ०८६२), ३१-सहायक अनुदान (वेतनेतर) अंतर्गत रु.४,७०,९६,०००/- इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

२. सदर शासन निर्णयान्वये वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपुर या संस्थेस "मागणी क्र. ए-४, २०७०-इतर प्रशासनिक सेवा, (००)(११), वनामती, नागपूर या संस्थेस एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सहायक अनुदान (अनिवार्य) (२०७० ०८६२), ३१-सहायक अनुदान (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली वनामती, नागपूर या संस्थेस **रु.४,७०,९६,०००/- (अक्षरी रुपये चार कोटी सत्तर लाख शहाण्णव हजार फक्त)** अनुदान वितरित करण्यात येत आहे.

३. सदर निधी खालील अटींच्या अधीन राहून वितरित करण्यात येत आहे.

१) वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपुर या संस्थेने खर्च वितरित अनुदानाच्या मर्यादेत ठेवावा व प्रत्यक्ष झालेल्या खर्चाइतकीच देयके कोषागारातून आहरित करण्याची दक्षता घ्यावी.

२) प्रत्यक्ष झालेल्या खर्चाइतकी देयके कोषागारात सादर करुन रक्कम आहरित केल्यानंतर आहरित केलेली रक्कम महालेखापाल कार्यालयातील लेख्यात त्याच शीर्षाखाली नोंदली गेली आहे किंवा नाही याची खात्री करुन घ्यावी व त्याबाबतचे प्रमाणपत्र १५ दिवसांच्या आत शासनास सादर करावे.

३) सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात केलेल्या खर्चाचा खर्च ताळमेळ करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित नियंत्रक अधिकारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

४) वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपुर या संस्थेने वितरित करण्यात आलेल्या अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र (UTILIZATION CERTIFICATE) महालेखापाल, महाराष्ट्र १/२, मुंबई/ नागपूर व शासनाला सादर करावे.

५) वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपुर या संस्थेने उपरोक्त अनुदानामधून केलेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे व पुस्तके ठेवण्यात यावीत. सदर लेखे व पुस्तके तपासण्याचे अधिकार महालेखापाल, महाराष्ट्र १/२, मुंबई/ नागपूर यांना राहतील व त्याकरिता यशदा, पुणे त्यांना संपूर्ण सुविधा उपलब्ध करुन देईल.

६) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक. अर्थसं - २०२६ / प्र. क्र. ४० / अर्थ - ३, दि.०९/०४/२०२६ मधील नमूद अटी/ शर्तींचे पालन करुन सदर निधी खर्च करण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या मान्यतेने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५६६/व्यय-४, दि.२३.०९.२०२६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१०१४१५०९४००२०७ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANISHA PRAVIN KINI

Digitally signed by MANISHA PRAVIN KINI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=108CBDAC08C7E940866A8FC97BFE7F861BF192CE9DD6B4D0924623149A51F9ED, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BE59ABCE2E8B3A2F8B88D3CB21BEE92FD81E2ED85D5357C0A88629268305FCA7, cn=MANISHA PRAVIN KINI
Date: 2026.10.14 15:10:33 +05'30'

**( मनिषा किणी )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
२. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
३. संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपुर
४. वरिष्ठ प्रशासनिक व लेखाधिकारी, वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपुर (३ जादा प्रतीसह),
५. वरिष्ठ कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, नागपूर
६. उप कोषागार कार्यालय, नागपूर
७. वित्त विभाग (व्यय-४/ अर्थसंकल्प-१४), मंत्रालय, मुंबई,
८. अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन-२५, मुंबई-३२,
९. निवडनस्ती/प्रशि-३